**महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुरक्षितीत ठेवणे) नियम, १९७१ मधील नियम २९ व ३० अंतर्गत केंद्र शासनाच्या डिजिटल क्रॉप सर्व्हे (DCS MH) या प्रणालीच्या अनुषंगाने पीक नोंदणी प्रक्रियेतील तरतुदीमध्ये सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः -जमीन-२०२२/प्र.क्र.१०६/जमीन-०१अ**
१ ला मजला, मंत्रालय, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः-१५ जुलै, २०२६

**वाचा -**

१. महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुरक्षित ठेवणे) नियम, १९७१ नियम २९ आणि ३०
२. महसूल व वन विभागाचे, शासन निर्णय, क्रमांक जमीन-२०१८/प्र.क्र.१२/भाग-१/ज-१अ, दिनांक ३०/०७/२०२१
३. महसूल व वन विभागाचे शासन निर्णय क्रमांक जमीन-२०२२/ प्र.क्र ७४/ज-१अ दिनांक ३१/०१/२०२३
४. कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र. १५७/१०अ दि. १४/१०/२०२४

**प्रस्तावना**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुरक्षित ठेवणे) नियम, १९७१ मधील तरतुदीनुसार गाव नमुना नंबर १२ वर पिकांच्या नोंदी प्रतिबिंबित करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे. संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णय दिनांक ३० जुलै, २०२१ अन्वये राज्यातील शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे स्वतःच्या शेतातील पिकांची नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यानंतर संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०२३ अन्वये शेतकऱ्यांनी केलेल्या पीक नोंदींची पडताळणी, गाव नमुना नं १२ वर पीक नोंदी प्रतिबिंबित करणे तसेच ई-पीक पाहणी प्रक्रियेमध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी सुधारित कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. दरम्यान, केंद्र शासनाने Digital Agriculture Mission अंतर्गत AgriStack चा भाग म्हणून Digital Crop Survey (DCS) ही देशव्यापी एकसमान पीक पाहणी प्रणाली विकसित केली असून सर्व राज्यांमध्ये एकसमान तांत्रिक मानके व कार्यपद्धतीनुसार पीक पाहणी राबविण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने राज्यामध्ये वापरात असलेली ई-पीक पाहणी प्रणाली अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित व केंद्र शासनाच्या प्रणालीशी सुसंगत करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या 'DCS MH' मोबाईल ॲपचा अवलंब करण्याबाबत राज्यस्तरीय पीक पाहणी समितीचे गठन करण्यात आले होते. सदर समितीच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाच्या 'DCS MH' मोबाईल App ची राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील एका तालुक्यातील १० गावाची अशा एकूण ३४० गावांची निवड करून प्रायोगिक तत्वावर (Pilot) चाचणी घेण्यात आली. त्याअंतर्गत पीक नोंदणी

प्रक्रिया, प्रत्यक्ष क्षेत्रीय अंमलबजावणी, ग्राम महसूल अधिकारी स्तरावरील पडताळणी, माहितीची अचूकता, प्रणालीची कार्यक्षमता, डेटा गुणवत्ता, केंद्र शासनाच्या प्रणालीशी सुसंगतता तसेच राज्यातील विद्यमान महसूल अभिलेख प्रणालीशी एकात्मता यांचे सविस्तर परीक्षण करण्यात आले. केंद्र शासनाची Digital Crop Survey (DCS MH) प्रणाली राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलात आणणे व्यवहार्य व उपयुक्त असल्याचे निदर्शनास आले असून, सदर प्रणालीमुळे देशभर एकसमान पीक पाहणी कार्यपद्धती विकसित होईल, केंद्र व राज्य शासनामधील माहितीची देवाणघेवाण अधिक सुलभ, प्रमाणित व परिणामकारक होईल, तसेच AgriStack, Farmer Registry व इतर कृषी विषयक डिजिटल सेवांसाठी आवश्यक असलेली अचूक व प्रमाणित माहिती उपलब्ध होईल, असे समितीने विश्लेषण केले. त्याअनुषंगाने दिनांक २७ मार्च, २०२६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीमध्ये खरीप हंगाम २०२६ पासून संपूर्ण राज्यामध्ये केंद्र शासनाच्या 'DCS MH' मोबाईल ॲपद्वारे पीक पाहणी करण्याची सर्वानुमते शिफारस करण्यात आली. त्यानंतर दिनांक १० एप्रिल, २०२६ रोजी मा. अपर मुख्य सचिव (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क) यांनी प्रायोगिक (Pilot) चाचणीचा अहवाल व समितीच्या शिफारशींचा आढावा घेतला. तसेच दिनांक २१ मे २०२६ रोजी कृषी विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय खरीप हंगाम पूर्व तयारी आढावा बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी केंद्र शासनाच्या DCS MH App चे लोकार्पण केले आहे. सद्यस्थितीत राज्यामध्ये कार्यान्वित असलेल्या ई-पीक (DCS) प्रणालीमध्ये प्रत्येक हंगामाच्या प्रारंभी निर्धारित केलेल्या कालावधीत (सुमारे ४५ दिवस) शेतकरी स्वतः मोबाईल ॲपद्वारे त्यांच्या पिकांची नोंदणी करीत होते. त्यानंतर उर्वरित कालावधीत (सुमारे ४५ दिवस) शेतकऱ्यांकडून नोंदणी न झालेल्या गटांची पीक नोंदणी पीक पाहणी सहायकांमार्फत करण्यात येत होती. तसेच, शेतकऱ्यांनी नोंदविलेल्या पीक नोंदींना ग्राम महसूल अधिकारी यांच्या मान्यतेची आवश्यकता नव्हती. शेतकरी स्तरावरील ४८ तासांचा दुरुस्ती कालावधी संपल्यानंतर सदर पीक नोंदी थेट गाव नमुना क्रमांक १२ वर प्रतिबिंबित होत होत्या. मात्र, केंद्र शासनाच्या Digital Crop Survey (DCS MH) App मध्ये पीक पाहणीची कार्यपद्धती मध्ये, हंगामाच्या पहिल्या दिवसापासूनच पीक पाहणी सहायकांमार्फत पीक नोंदणी करण्यात येते. तसेच, प्रणालीमध्ये नोंदविण्यात आलेल्या सर्व (१०० टक्के) पीक नोंदींची पडताळणी संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येते. सदर प्रक्रियेच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०२३ मधील कार्यपद्धतीमध्ये आवश्यक सुधारणा करून केंद्र शासनाच्या 'DCS MH' मोबाईल ॲपद्वारे पीक पाहणी, पडताळणी व गाव नमुना क्रमांक १२ मध्ये पीक नोंदी प्रतिबिंबित करण्याबाबत सुधारित कार्यपद्धती नव्याने निश्चित करणे आवश्यक आहे.

## शासन निर्णय

दिनांक ३१ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयामधील मुद्दा क्रमांक (ब) येथील वेब आज्ञावली प्रक्रिया पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे:-

केंद्र शासनाच्या DCS मोबाईल ॲपद्वारे पिकांच्या नोंदवहीत नोंदी करण्याची सुधारित प्रक्रिया खालीलप्रमाणे :-

(१) दरवर्षी लागवड केलेली पिके शेतात उभी असताना केव्हाही आणि शासनाने विविध पिकांसाठी विहित केलेल्या अंतिम तारखेपर्यंत अथवा यथास्थिती शासनाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या तारखेपर्यंत, संबंधित पीक पाहणी सहायकाने शेतात प्रत्यक्ष पाहणी करून केंद्र शासनाच्या 'DCS MH' मोबाईल ॲपमध्ये शासनाने विहित केलेल्या पद्धतीनुसार पिकांची नोंद करणे आवश्यक राहील. हंगाम निहाय लागवड केलेल्या पिकांची नोंद शासनाने अधिमान्यता दिलेल्या मोबाईल 'DCS MH' मोबाईल ॲपद्वारे करण्यात यावी.

(२) पीक पाहणी सहायकांची नियुक्ती संबंधित तहसिलदार यांनी करावी. प्रत्येक १००० ते १५०० ओनर्स प्लॉटसाठी किमान एका पीक पाहणी सहायकाची नियुक्ती करणे आवश्यक राहील. पीक पाहणी सहायक म्हणून कोतवाल, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) चे कर्मचारी, कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) चालक तसेच ग्रामस्तरावर मानधन तत्त्वावर कार्यरत इतर विभागांतील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. मानधन तत्त्वावरील कर्मचारी उपलब्ध नसल्यास, MyBharat पोर्टलवर नोंदणीकृत नेहरू युवा स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात यावी.

(३) संबंधित पीक पाहणी सहायकाने लागवड केलेल्या पिकांच्या तपशीलासह लागवड केलेल्या पिकाचे क्षेत्र, जलसिंचनाचा स्त्रोत व प्रकार, शेताच्या बांधावरील वृक्ष, कायम पड जमीन, शेतातील उपलब्ध पायाभूत सुविधा तसेच शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या इतर बाबींची माहिती केंद्र शासनाच्या 'DCS MH' मोबाईल ॲपमध्ये विहित कार्यपद्धतीनुसार पीक पाहणी सहायकाने अचूक नोंदविणे आवश्यक आहे.

(४) संबंधित पीक पाहणी सहायकाने शेताच्या बांधापासून २० मीटरच्या आत उभे राहून शेतातील उभ्या पिकांचे, शेताच्या बांधावरील वृक्षांचे तसेच नोंदविलेल्या कायम पड जमिनीचे अक्षांश (Latitude) व रेखांश (Longitude) यांसह जिओ-टॅग केलेली किमान दोन सुस्पष्ट छायाचित्रे केंद्र शासनाच्या 'DCS MH' मोबाईल ॲपच्या माध्यमातून विहित कार्यपद्धतीनुसार अपलोड करणे आवश्यक राहील.

(५) पीक पाहणी सहायकाने 'DCS MH' मोबाईल ॲपद्वारे नोंदविलेल्या माहितीच्या सत्यतेबाबत विहित नमुन्यातील स्वयंघोषणापत्र 'DCS MH' मोबाईल ॲपच्या माध्यमातून सादर करणे बंधनकारक राहील.

(६) पीक पाहणी सहायकाने 'DCS MH' मोबाईल ॲपद्वारे नोंदविलेल्या सर्व पीक पाहणी नोंदींची १०० टक्के पडताळणी (Verification) संबंधित ग्राम महसूल अधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल त्यानंतर गाव नमुना नं १२ वर प्रतिबिंबित होईल.

(७) पीक पाहणी सहायकाने 'DCS MH' मोबाईल ॲपद्वारे नोंदविण्यात आलेली पीक पाहणीची माहिती ग्राम महसूल अधिकाऱ्याच्या पडताळणीअंती चुकीची अथवा वस्तुस्थितीशी विसंगत आढळल्यास, संबंधित पीक नोंद रद्द करण्यात येईल. तसेच, सदर क्षेत्राची पीक नोंदणी पुन्हा करण्यासाठी ते क्षेत्र 'DCS MH' मोबाईल ॲपमध्ये संबंधित पीक पाहणी सहायकास उपलब्ध करून देण्यात येईल.

(८) ग्राम महसूल अधिकारी यांनी 'DCS वेबसाईट द्वारे प्रमाणित केलेली पीक पाहणीची माहिती गाव नमुना नं १२ वर प्रतिबिंबित झाल्यानंतर, त्या माहितीमध्ये कोणतीही दुरुस्ती अथवा बदल आवश्यक असल्यास संबंधित शेतकऱ्यास चालू हंगाम संपण्यापूर्वी मंडळ अधिकाऱ्याकडे DCS वेब प्रणालीद्वारे अर्ज सादर करता येईल.

(९) मुद्दा क्रमांक (८) मधील तरतुदीनुसार संबंधित शेतकऱ्याकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर, मंडळ अधिकारी शक्य तितक्या लवकर चालू हंगाम संपण्यापूर्वी सदर अर्जाची दखल घेऊन नोंदीची पडताळणी करण्यासाठी संबंधित शेतास भेट देतील. आवश्यकतेनुसार अर्जदारास पूर्वसूचना देऊन शेतस्तरावर प्रत्यक्ष पाहणी, आवश्यक चौकशी व पंचनामा करतील. पडताळणीअंती नोंद चुकीची अथवा वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे आढळल्यास, संबंधित पीक नोंदीमध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्यात येईल.

(१०) पीक पाहणी सहायकाने 'DCS MH' मोबाईल ॲपद्वारे नोंद केलेली तसेच ग्राम महसूल अधिकाऱ्याने पडताळणी करून सत्यापित व मंजूर केलेली पीक पाहणीची माहिती, जोपर्यंत ती वस्तुस्थितीच्या विरुद्ध असल्याचे सिद्ध होत नाही तोपर्यंत, सर्व शासकीय योजना व लाभ, जसे की, पीक कर्ज, पीक विमा तसेच शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या इतर कृषी योजनांसाठी वैध मानण्यात येईल.

(११) बहुवार्षिक फळबागा, जसे की, काजू, आंबा, पेरू, चिकू इत्यादींची वेब ॲपद्वारे एकदा नोंदणी झाल्यानंतर, संबंधित फळबाग शेतामध्ये अस्तित्वात असल्याचे गृहीत धरून पुढील सलग तीन वर्षे पुनः नोंदणी करणे आवश्यक राहणार नाही. अशा कालावधीत सदर फळबागेची नोंद नोंदणीच्या वर्षासह पुढील ३ वर्षे स्वयंचलित पद्धतीने गाव नमुना क्रमांक १२ वर प्रतिबिंबित करण्यात येईल. तथापि, सदर फळबागेमध्ये कोणताही बदल, नष्ट होणे, क्षेत्रामध्ये बदल अथवा इतर कोणताही फरक झाल्यास संबंधित जमीनधारकाने त्याबाबत संबधित सहायकास हंगामाच्या सुरवातीस अवगत करून द्यावे.

(१२) Digital Crop Survey (DCS MH) प्रणालीद्वारे संकलित होणारी पीक पाहणीची माहिती ३ वर्षांपर्यंत ऑनलाईन उपलब्ध ठेवण्यात येईल तसेच त्यानंतर पुढील ५ वर्षांसाठी डिजिटल स्वरूपात संग्रहित करण्यात येईल. तत्पूर्वी संकलित झालेली सर्व माहिती (डेटा) देखील डिजिटल स्वरूपात स्वतंत्रपणे सुरक्षित ठेवण्यात येईल.

(१३) 'DCS MH' मोबाईल ॲपद्वारे संकलित होणारी पीक पाहणीची माहिती, शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना, सेवा व लाभ यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या उद्देशांसाठी संबंधित विभागांना उपलब्ध करून देता येईल.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१५१२३६०६५३४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAIKWAD SHOBHA SIDRAM

Digitally signed by GAIKWAD SHOBHA SIDRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department,
2.5.4.20=6CE79E4118D3F8DC903D5D7A251B6AE278DF2BD83241BCB08E4970CA1E043C6F, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=0122946CA612499B33E243FD18A1730AAF64312287DA0BD70F1A97D5A80F61ED, cn=GAIKWAD SHOBHA SIDRAM
Date: 2026.07.15 12:36:57 +05'30'

**( शोभा गायकवाड )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्री.व यु.कल्याण, अ.वि. आणि औकाफ विभाग), यांचे सचिव
४. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. मा. मंत्री (कृषी), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१४. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद सदस्य
१५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१९. सर्व विभागीय आयुक्त
२०. आयुक्त, कृषी महाराष्ट्र राज्य, पुणे

२१. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे
२२. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३. व्यवस्थापकीय संचालक, कृत्रिम बुध्दिमत्ता व ॲग्रिटेक नाविन्यता केंद्र (AIAIC), मुंबई
२४. सर्व जिल्हाधिकारी
२५. सर्व विभागीय कृषी सहसंचालक
२६. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२७. सर्व जिल्हा कृषी अधिकारी
२८. सर्व उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) /सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख
२९. सर्व तहसिलदार/ सर्व तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख
३०. निवडनस्ती (जमीन-०१अ)